।। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।।

'A'GRADE
NAAC REACCREDITED
(3rd Cycles)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## जनसंवाद आणि पत्रकारिता विभाग

## एम.ए. (एम.सी.जे.) दोन वर्षीय पदव्युत्तर अभ्यासक्रम

## प्रवेश माहिती पुस्तिका

● *अधिक माहितीसाठी संपर्क* ●


**डॉ. सुधीर भटकर (विभाग प्रमुख) : ९४२३४९००४४**

**डॉ. विनोद निताळे**
९८६००४६७०६

**डॉ. गोपी सोरडे**
९८३४१६६०७८

**डॉ. सोमनाथ वडनेरे**
९८५०६९३७०५

फॅक्स : (०२५७) २२५८४०३ व २२५८४०६

वेबसाईट : http://www.nmu.ac.in

E-mail- mcjkbcnmu@gmail.com

# जनसंवाद आणि पत्रकारिता विभाग

माहिती आणि संवाद तंत्रज्ञान व प्रसार माध्यमांच्या क्षेत्रामध्ये झपाट्याने बदल होत आहेत. कार्पोरेट आणि विपणन उद्योगाचा विस्तारही तितक्याच वेगाने होत आहे. या परिस्थितीमध्ये प्रशिक्षित आणि सक्षम मनुष्यबळाची आवश्यकता निर्माण झाली आहे. ही वस्तुस्थिती डोळयासमोर ठेवून या क्षेत्रात सक्षम आणि प्रभावी विद्यार्थी घडविण्याकरीता कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने (पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ) जनसंवाद आणि पत्रकारिता विभाग २००६-२००७ मध्ये सुरु केला. या विभागांतर्गत एम.ए. (जनसंवाद आणि पत्रकारिता) हा दोन वर्षाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु आहे. शैक्षणिक सत्र २०१०-११ पासून सदरचा पदव्युत्तर अभ्यासक्रम सत्र पध्दतीनुसार सुरु करण्यात आलेला आहे. तज्ज्ञ शिक्षकवर्ग, संगणक लॅब, प्रशस्त वर्ग खोल्या, दृकश्राव्य साधने, अध्यापनासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, विभागांतर्गत ग्रंथालय ही या विभागाची वैशिष्ट्ये आहेत. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरीता विभागातर्फे वेळोवेळी विविध उपक्रम/ कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा आलेख चढता राहिलेला आहे. पत्रकारितेच्या सैध्दांतिक ज्ञानाबरोबरच विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकांचे सखोल अध्ययन करता यावे यासाठी विद्यार्थ्यांना मुद्रीत व इलेक्ट्रॉनिक माध्यमांसोबतच जाहिरात संस्था आणि जनसंपर्क कार्यालय या ठिकाणी प्रशिक्षणासाठी पाठविले जाते. पत्रकारितेचे व्यापक क्षेत्र लक्षात घेता केवळ अभ्यासक्रमावर आधारित शिक्षण न देता विद्यार्थ्यांना सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय तसेच अन्य क्षेत्रांचीही माहिती व्हावी याकडे विभागाने विशेष लक्ष केंद्रीत केले आहे. याचाच भाग म्हणून विभागात विविध विषयांवरील परिसंवाद, परिषदा, कार्यशाळा, मान्यवरांची व्याख्याने, मुलाखती इत्यादीचे आयोजन केले जाते. वादविवाद स्पर्धा, एकांकिका स्पर्धा, क्रीडा स्पर्धा तसेच संशोधन क्षेत्रामध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवावा यासाठी विभागाच्यावतीने वैयक्तिक मार्गदर्शन आणि प्रोत्साहन देण्यात येते. अल्पावधीतच विभागाने स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. याचाच परिपाक म्हणून विभागाचे विद्यार्थी विविध वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्या, माहिती कार्यालय या ठिकाणी वेगवेगळ्या पदांवर कार्यरत आहेत.

दरवर्षी विभागातील विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकतात . आतापर्यंत विभागातील सात विद्यार्थ्यांनी जनसंवाद आणि पत्रकारिता या विषयात सुवर्णपदक प्राप्त केले आहे. सोबतच जनसंवाद आणि पत्रकारिता या विषयात विद्यापीठात प्रथम येणा-या विद्यार्थीनीला मिळणारा कै.कमलाताई चौघुले पुरस्कार देखील विभागातील विद्यार्थीनींनी मिळविलेला आहे. विभागाचे पाच विद्यार्थी नेट /सेट उत्तीर्ण झाले असून सहा विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पदवी प्राप्त केलेली आहे. दरवर्षी विभागाचा निकाल उत्कृष्ट राहिलेला आहे. विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळावा याकरीता विभागातर्फे त्यांना विविध स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. त्याचाच भाग म्हणून विद्यार्थ्यांनी विद्यापीठ परिक्षेत्रात तसेच महाराष्ट्रात इतरत्र आयोजित वाद-विवाद स्पर्धा, नाट्य स्पर्धा, संशोधन स्पर्धा, क्रीडा स्पर्धा आदी ठिकाणी सहभाग नोंदवून घवघवीत यश संपादन केले आहे. जनसंवाद आणि पत्रकारिता क्षेत्रासोबतच साहित्य, नाट्य, संगीत, समाजकारण, राजकारण या क्षेत्रातील मान्यवरांशी विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष संपर्क व्हावा याकरीता विभागाने महाराष्ट्र भूषण कविवर्य मंगेश पाडगावकर, कवी अरूण

म्हात्रे, संगणक तज्ज्ञ अच्युत गोडबोले, पहिले विश्वमराठी साहित्य संमेलन अध्यक्ष गंगाधर पानतावणे, लोकप्रभाचे संपादक विनायक परब, पाकिस्तान येथील जेष्ठ पत्रकार कुट्टी, मुंबई येथील अमेरिकन उच्च आयुक्तालयाचे क्रिस्टन डॉलबेलो व सुमेधा रायकर आदी अनेक मान्यवरांचे मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित केले आहे. संशोधनाच्या क्षेत्रात विद्यार्थ्यांना रूची निर्माण व्हावी आणि गुणवत्तापूर्ण संशोधन विद्यार्थ्यांनी करावे यासाठी विभागातर्फे दरवर्षी विविध उपक्रम देखील राबविण्यात येतात. विभागाचे विद्यार्थी सातत्याने अविष्कार स्पर्धेत सहभाग नोंदवून यश प्राप्त करतात. सोबतच राज्यस्तरीय / राष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्रे/परिषदांमध्ये सहभाग नोंदवून शोध निबंधाचे वाचन देखील विद्यार्थी करतात. विभागातर्फे देखील दरवर्षी राष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्रे/परिषदांचे आयोजन नियमितपणे करण्यात येते.

विभागातर्फे दरवर्षी स्थानिक व शहराबाहेरील अभ्यासदौ-याचे आयोजन करण्यात येते. स्थानिक अभ्यासदौ-यांतर्गत विद्यार्थ्यांना येथील वृत्तपत्र कार्यालय, आकाशवाणी केंद्र, जिल्हा माहिती कार्यालय, जाहिरात संस्था, मुद्रण व प्रकाशन संस्था या ठिकाणी नेण्यात येते. तर शहराबाहेरील आयोजित अभ्यासदौ-यांतर्गत मुंबई, माऊंटआबू, दिल्ली, आग्रा व अमृतसर, हैद्राबाद, औरंगाबाद भोपाल, इंदौर, पुणे या ठिकाणी विद्यार्थ्यांना नेण्यात आले होते. मुंबई येथे आयोजित अभ्यासदौ-यात विद्यार्थ्यांनी वृत्तपत्र कार्यालय, न्यूज चॅनेल्स, दूरदर्शन केंद्र, आकाशवाणी केंद्र, चित्रपट नगरी, जनसंपर्क आणि माहिती महासंचनालय आदी ठिकाणी भेटी देवून तेथील कामकाजाची माहिती घेतली. माऊंटआबू येथे आयोजित अभ्यासदौ-यात विद्यार्थ्यांना माध्यमांची नैतिकता या विषयावर आयोजित राष्ट्रीय कार्यशाळेत प्रसारमाध्यमातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभले. तर दिल्ली, आग्रा व अमृतसर असा संयुक्तपणे आयोजित अभ्यासदौ-यात विद्यार्थ्यांनी दिल्ली येथे वृत्तपत्र नोंदणी कार्यालय, हिंदी न्यूज चॅनेल्स, दूरदर्शन केंद्र, माध्यम नियंत्रण संस्था, वृत्तपत्र नोंदणी कार्यालय तसेच राष्ट्रपती मा.प्रतिभाताई पाटील, केंद्रीय कृषीमंत्री मा.शरद पवार या मान्यवरांच्या भेटी घेतल्या. सोबतच दिल्ली येथील राष्ट्रपती भवन व इतर प्रेक्षणिय स्थळांना भेटी देवून माहिती घेतली. आग्रा येथील ताजमहल व अमृतसर येथील वाघा बॉर्डर आणि सुवर्णमंदीर बघून विद्यार्थ्यांना विशेष उत्साह लाभला. हैद्राबाद येथील चित्रपट नगरी व प्रसारमाध्यमांच्या कार्यालयाचा अवाका बघून विद्यार्थी मंत्रमुग्ध झाले. पुणे येथील फिल्म इन्स्टिट्यूट भोपाल येथील माखनलाल चतुर्वेदी राष्ट्रीय पत्रकारिता एवं विश्वविद्यालय आदि ठिकाणीही भेटी दिल्या. दरवर्षी विभागातर्फे आयोजित वैवध्यपूर्ण उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना चालना मिळते.

माध्यम क्रांतीचा आणि माहितीच्या स्फोटाचा परिणाम म्हणून प्रसिध्दी माध्यमांमध्ये आमुलाग्र व झपाट्याने बदल, विकास होत असून या क्षेत्रातील आव्हाने पेलण्यास कुशल व सक्षम मनुष्यबळाचा अभाव जाणवत आहे. ही आव्हाने पेलण्यास कुशल व सक्षम मनुष्यबळ प्रशिक्षित करण्याच्या हेतूने अद्ययावत असा माहिती तंत्रज्ञान समाविष्ट जनसंवाद आणि पत्रकारिता या दोन वर्षाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम सत्रपध्दतीनुसार शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून सुरु करण्यात आलेला आहे. भविष्यात माध्यमांप्रमाणे जनसंपर्काचे महत्व वादातीत राहणार असून सामाजिक जगासह उद्योग, सहकार, शिक्षण, आरोग्य, व्यापार व प्रत्येक क्षेत्रात ‘जनसंवाद

आणि पत्रकारिता' या दोन वर्षाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाबरोबर अल्प मुदतीचे विविध उपयोजित पदविका तसेच प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करण्याचा मानस आहे. या विभागात अद्ययावत स्टुडिओची निर्मिती तसेच कम्युनिटी रेडिओ स्टेशन प्रस्तावित आहे.

जनसंवाद आणि पत्रकारिता विभाग हा दूरदर्शी विचारांचे द्रष्टे मा.कुलगुरु, मा.प्र-कुलगुरु व्यासंगी व व्यापक शैक्षणिक दृष्टीकोन बाळगणारे मा.कुलसचिव व विद्यार्थी हाच विद्यापीठाचा मध्यवर्ती घटक मानून प्राकृतिक, शैक्षणिक व संशोधनात्मक आखणी करणारे विद्यापीठ अधिकार मंडळाचे सदस्य, अधिकारी व कर्मचारी या सर्वांच्या व्यापक प्रयत्नातून हा विभाग विकसित झाला आहे.

## प्रवेश क्षमता व शैक्षणिक पात्रता

| | |
|---|---|
| **अभ्यासक्रम :** | **एम.ए. जनसंवाद आणि पत्रकारिता** |
| प्रवेश क्षमता : | ३० |
| शैक्षणिक पात्रता : | कोणत्याही विद्याशाखेचा पदवीधर, पदवी परीक्षेला किमान ४०% गुण असणे अनिवार्य आहे. |

## प्रवेशाबाबतचे नियम

१) मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी प्रवेशाच्या आरक्षित जागा (एम.ए. जनसंवाद आणि पत्रकारिता) या विषयांच्या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी महाराष्ट्र शासनाने निर्धारित केल्याप्रमाणे मागासवर्गीयांसाठी त्या त्या टक्केवारीने जागा राखीव आहेत. त्यासाठी आरक्षित जागांचा तक्ता खालीलप्रमाणे

| | **आरक्षित जागांचे टक्केवारीनुसार प्रमाण** | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Total of Seats | SC 13% | ST 7% | DT(A)- 3% NT(1)-2.5% NT (2)- 3.5% NT(3)- 2% | OBC 19% | EWS 10% | Other University 10% | Active ExService Men 2% | Handicap 3% |
| एकूण प्रवेश क्षमता | अनुसूचीत जाती १३% | अनुसूचीत जमाती ७% | भटक्या-३% एन.टी अ-२.५% एन.टी ब-३.५% एन.टी.क-२% | इतर मागासवर्गीय १९% | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक १०% | इतर विद्यापीठा बाहेरील १०% | माजी सैनिक व सैनिकांचे पाल्य २% | अपंगासाठी ३% |

**** शासनाने आरक्षणाबाबत वेळोवेळी बदल केल्यानुसार प्रवेश देण्यात येईल.***

१) मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या त्या-त्या संवर्गातील उमेदवार / विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास त्या रिक्त जागांमधून २% जागा विशेष मागासवर्गातील (S.B.C.) विद्यार्थ्यास पात्रतेनुसार प्रवेश दिला जाईल.

२) इतर विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी १०% जागा राखीव आहेत.

३) अपंगासाठीच्या ३% जागांच्या आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणा-यास सक्षम प्राधिका-यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

४) आजी / माजी सैनिक आरक्षणाकरीता राखीव असलेल्या २% जागा भरतांना विद्यापीठाने निर्धारित केलेल्या परिपत्रक क्र.९२/२००५, दि. मार्च २००५ अनुसार कार्यवाही करण्यात येईल. प्रवेशित विद्यार्थ्याचे पालक माजी सैनिक असल्याचे प्रमापणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

५) प्रवेश प्रक्रियेच्या दुस-या फेरीच्या अखेरीस रिक्त राहिलेल्या जागा भरत असतांना इतर विद्यापीठे / राज्य या कार्यक्षेत्रातून विद्यार्थी घेण्याचे कमाल संख्येचे (एकूण प्रवेश क्षमतेच्या १०%) बंधन लागू राहणार नाही. तथापी अशा रिक्त राहिलेल्या जागांवर विद्यार्थ्यांचे प्रवेश करण्यापूर्वी गुणवत्ता यादीतील अन्य विद्यापीठाच्या क्षेत्रातील तसेच महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थी प्रवेशासाठी उपलब्ध नाहीत. याची खात्री करूनच कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल.

६) गुणवत्ता यादी तयार करतांना गुणपत्रकातील Grand Total अनुसार दर्शविलेले गुण ग्राह्य धरले जातील.

अ) मागासवर्गीयांसाठी आरक्षित केलेल्या जागांवर प्रवेश घेऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांना प्रवेश अर्जासोबत जातीच्या प्रमाणपत्राची प्रत जोडावी लागेल हे प्रमाणपत्र महाराष्ट्रातील दंडाधिकारी / तहसीलदार/ न्यायदंडाधिकारी यांनी दिलेले असावे व त्यात उमेदवारांची जात ही महाराष्ट्रात मागासवर्गीय म्हणून समाविष्ट असल्याची नोंद असावी.

अ) एन.टी.-२, एन.टी-३ व इतर मागासवर्गीय संदर्भातील उमेदवाराच्या प्रवेश अर्जासोबत जातीच्या प्रमाणपत्रासोबतच संबंधित उमेदवाराच्या जिल्ह्यातील उपजिल्हाधिकारी अथवा उपविभागीय अधिका-याने प्रमाणित केलेल्या नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्रकाची साक्षांकित सत्यप्रत (प्रवेशित वर्षातील) जोडावी. उमेदवाराने प्रत्यक्ष प्रवेशाच्या (Spot Admission) वेळी नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राची मुळप्रत सादर न केल्यास त्याच्या प्रवेश खुल्या संवर्गातूनच ग्राह्य धरला जाईल व आरक्षित जागेवर प्रवेशित विद्यार्थ्याला मिळणारे शुल्क सवलतीचे लाभ मिळणार नाहीत.

७) कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील पुरेसे विद्यार्थी प्रवेशासाठी उपलब्ध नसतील. तर दुस-या / बाहेरील विद्यापीठांच्या परिक्षेत्रातील विद्यार्थ्यांना, त्यांच्यासाठी राखीव असलेल्या १०% जागांच्या अतिरिक्त अन्य रिक्त जागांवर त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार प्रवेश दिला जाईल.

८) विद्यापीठाच्या प्रशाळा शैक्षणिक विभागाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाला प्रवेश घेतलेल्या कोणत्याही विद्यार्थ्यास त्याच्या दोन्ही शैक्षणिक वर्षात विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयात प्रवेश स्थानांतरित (Transfer) करता येणार नाही. अर्थात घेतलेला प्रवेश रद्द करून संलग्नित महाविद्यालयाच्या कोणत्याही अभ्यासक्रमात प्रवेश घेण्यास त्याला मुभा राहील.

९) प्रवेशाच्या संदर्भात महाराष्ट्रात राज्य शासनाने मागासवर्गीयांच्या आरक्षणाच्या धोरणात जर ही प्रवेश प्रक्रिया सुरु होण्यापूर्वी / पूर्ण होण्यापूर्वी काही बदल केले, तर त्या धोरणांच्या विचार करण्यात येऊन

त्याप्रमाणे आरक्षणाचे धोरण राबविले जाईल.

१०) शैक्षणिक वर्षातील प्रवेश प्रक्रियेच्या कालावधीत व प्रवेश क्षमतेत बदल करण्याचे अधिकार विद्यापीठाने राखून ठेवले आहेत.

११) एखाद्या मागासवर्गीय घटकांसाठी पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या जागा नियमानुसार व गुणवत्तेनुसार मागासवर्गीयांच्या इतर घटकांमधून खालीलप्रमाणे भरण्यात येतील.

एस.टी. एस.सी. डी.टी. / एन.टी. (१, २, ३) ओबीसी

१२) यानंतर ही संवर्गातील जागा शिल्लक राहिल्यास एस.बी.सी. (२%) प्रवेश क्षमतेच्या प्रवर्गातील जागा भरण्यात येतील.

१३) राखीव संवर्गातून जागा शिल्लक राहिल्यास त्या खुल्या संवर्गातून गुणवत्तेनुसर भरण्यात येतील.

१४) एम.ए. भाग-१ केल्यानंतर काही विद्यार्थी कालावधीचा खंड पडल्यानंतर पुन्हा एम.ए. भाग-२ करीता प्रवेशाची मागणी करतात. तेव्हा याबाबत विद्यार्थ्यांना भाग-१ च्या प्रवेशासाठी असलेला अभ्यासक्रम बदलला नसल्यास त्या विद्यार्थ्यांना भाग-२ करीता प्रवेश देण्यात येईल किंवा विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार प्रवेश देण्यात येईल.

१५) नोकरी करणारे व्यक्तीदेखील प्रवेश घेऊ शकतात. परंतु त्यांना ते जेथे नोकरी करतात त्या संस्थेचे / कार्यालयाचे नाहरकत प्रमाणपत्र प्रवेश घेतेवेळी सादर करणे आवश्यक राहिल.

# प्रवेश शुल्क

एम. ए. (एम.सी.जे.) विभागाच्या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश (Fee Structure) शुल्क खालीलप्रमाणे

| Sr.No. | Particulars | M.A. (M.C.J.) | |
|---|---|---|---|
| | | **I[st]/II[nd]sem (एकत्रित)** | **III[rd]/IV[th]Sem (एकत्रित)** |
| 1. | Admission Fee | 25 | 25 |
| 2. | Tution Fee | 4000 | 4000 |
| 3. | Registration Fee | 100 | 100 |
| 4. | Library Fee | 200 | 200 |
| 5. | Medical Fee | 25 | - |
| 6. | Gymkhana Fee | 150 | 150 |
| 7. | Internal Exam. Fee | 300 | 300 |
| 8. | Eligibility Fee* | 150* | - |
| 9. | Laboratory Fee | 1000 | 1000 |
| 10. | University Development Fund | 100 | 100 |
| 11. | Student Welfare & Activity Fee | 100 | 100 |
| 12. | Poor Student Aid Fund | 50 | 50 |
| 13. | Library Deposits | 200 | - |
| 14. | Study Material Fee | 300 | 300 |
| 15. | Caution Money Deposit | 100 | - |
| 16. | Computerization Fee | 100 | 100 |
| 17. | Student Group Insurance | 20 | 20 |
| 18. | Internet & Email Fee | 150 | 150 |
| 19. | Gathering Fee | 50 | 50 |
| 20. | Identify Card | 50 | 50 |
| 21. | Alumni Association Fee | 200 | - |
| 22. | Miscellanceous Fee | 100 | 100 |
| 23. | Magazine Fee | 50 | 50 |
| 24. | Ashwamedh Fee | 30 | 30 |
| | **Total** | **7,5,35/-** | **6,860/-** |

**Eligibility fee for other state students Rs. 300/-**

एम.ए. (जनसंवाद आणि पत्रकारिता) अभ्यासक्रमातंर्गत अभ्यासदौरा असून अभ्यास दौ-यासाठी शुल्क त्या त्या परिस्थितीनुरूप किंवा प्रत्यक्ष खर्चानुसार त्या वर्षात आकारली जाईल. हा अभ्यासदौरा प्रत्येक विद्यार्थ्याला सक्तीचा राहील.











- मा.कुलगुरुंचे प्रेरणादायी मार्गदर्शन
- भव्य ग्रंथालय
- अत्याधुनिक संगणक प्रयोगशाळा
- व्ही सॅट इंटरनेट सुविधा
- कुशल प्राध्यापक वर्ग
- भव्य क्रिडा संकुल, नियमित सराव
- तज्ज्ञांचे मार्गदर्शन
- आवश्यक अभ्यास दौरे
- विद्यार्थी व विद्यार्थीनींचे स्वतंत्र वसतीगृह
- मेस व कॅन्टीनची व्यवस्था
- मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शासनाकडून शिष्यवृत्ती
- आरोग्य केंद्राद्वारे वैद्यकीय सुविधा
- विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव

















माजी कुलगुरु मा.डॉ.एस.एफ.पाटील मार्गदर्शन करतांना.



मास कम्युनिकेशन विभागाच्या 'विद्यापीठ वार्ता' या अनियतकालीकाचे प्रकाशन.



नेट-सेट कार्यशाळेत मा. कुलगुरु मार्गदर्शन करतांना.



नेट-सेट कार्यशाळेत डॉ.बी.व्ही.पवार यांचे मार्गदर्शन.



सौ.मनिषा म्हैसकर, महासंचालक,माहिती व जनसंपर्क, म.रा. यांच्या समवेत



लोकसत्ताचे संपादक श्री.कुमार केतकर यांचे समवेत.



नेट-सेट कार्यशाळेत प्रा.कमलाकर पायल, अमरावती हे मार्गदर्शन करतांना.



'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता' या विषयावर बोलतांना श्री.जयसिंग वाघ.



सावित्रीमाई फुले यांना अभिवादन करतांना.



अभिनेता श्री.पुष्कर श्रोती यांच्या समवेतपत्रकारिता विभाग.



'स्वरतरंग' संगीत मैफीलीत गीत सादर करतांना विद्यार्थी.



सह्याद्री वाहिनीच्या 'स्मार्ट सुनबाई' या कार्यक्रमाच्या शुटिंगच्या वेळी विद्यार्थी



'फिल्मसिटी' येथे आऊटडोअर शुटिंगच्या वेळी विद्यार्थी



ज्येष्ठ कवी श्री.मंगेश पाडगांवकर संवाद साधतांना



मास कम्युनिकेशन विभागाच्या 'उमवि वार्ता' या नियतकालीकाचे प्रकाशन.



दैनिक लोकमत कार्यालयास भेट



प्रसिद्ध साहित्यिक श्री.गंगाधर पानतावणे यांचा सत्कार



दैनिक सकाळ कार्यालयास भेट



कवी श्री.अरुण म्हात्रे संवाद साधतांना



नेट सेट मार्गदर्शन कार्यशाळा उद्घाटन करतांना कुलसचिव
डॉ.एम.व्ही.बरीदे,व्य.प.सदस्य डॉ.बी.व्ही.पवार, प्रा.कमलाकर पायस



विद्यार्थी स्वागत समारंभात बोलतांना
माहिती अधिकारी श्री.मनोज सानप



माजी कुलगुरु डॉ.एस.एफ.पाटील मार्गदर्शन करतांना



नेट सेट मार्गदर्शन कार्यशाळा समारोप प्रसंगी बोलतांना
व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा.डॉ.पी.आर.चौधरी



एकांकिका सराव करतांना विद्यार्थी-विद्यार्थीनी



व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा.डॉ.एल.ए.पाटील
मार्गदर्शन करतांना



उच्च शिक्षण सहसंचालक डॉ.आर.बी.कान्हेरे
मार्गदर्शन करतांना



माऊंटआबू येथे अभ्यास दौरा



जळगाव आकाशवाणी केंद्रास भेट



संगणक तज्ज्ञ श्री.अच्युत गोडबोले
मार्गदर्शन करतांना



जिल्हा माहिती कार्यालयास भेट



सह्याद्री वाहिनीच्या
'स्मार्ट सुनबाई' या कार्यक्रमाच्या
शुटिंगच्या वेळी विद्यार्थी



फिल्मसिटी येथे
आऊटडोअर शुटिंगच्या
वेळी विद्यार्थी

# काही क्षणचित्रे....



दूरचित्रवाणी पत्रकारिता कार्यशाळा



उच्च व तंत्रशिक्षणमंत्री मा. राजेश टोपे व
कृषी राज्यमंत्री मा. गुलाबराव देवकर यांच्या समवेत विद्यार्थी



राष्ट्रपतीभवन येथे शिक्षकांसमवेत विद्यार्थी



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीप्रसंगी
शिक्षकवृंद व विद्यार्थी



पत्रकार दिनी आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना
ज्येष्ठ पत्रकार अनिल पाटील



पर्यावरण संवाद व्याख्यानमालेचे वृक्ष लावून
उद्घाटन करतांना कुलसचिव डॉ. ए. एस. महाजन



'अहिंसा संशोधन' विषयावर मार्गदर्शन करतांना
डॉ. प्रभाकर सिंह (इंदौर)



औरंगाबाद लोकमत कार्यालय भेटीप्रसंगी
संपादक चक्रधर दळवी यांच्या समवेत शिक्षक व विद्यार्थी



पर्यावरण संवाद या विषयावर मार्गदर्शन करतांना
डॉ. सी. पी. माहुलीकर



दौलताबाद येथील देवगिरी किल्ला भेटीप्रसंगी विद्यार्थी व शिक्षक



जिल्हा माहिती कार्यालय भेटी प्रसंगी विद्यार्थी व शिक्षक